निशाणी क्र.११ पुढे चालू

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास व्ही.सी.वर :-**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – गणेश शिवाजी पोतदार,

वय – ३६ वर्षे, व्यवसाय– सराफ व्यापार,

पत्ता – रा.हरीजवळगा, ता.निलंगा, जि.लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः-**

(आता मला जप्त मुद्देमाल एम.आर.नंबर २८/२०२६ मधील एकूण १०८ पैंजन जोड दाखवण्यात आले) ते १०८ पैंजन जोड माझ्या दुकाणातून चोरीस गेलेले होते. माझ्या दुकाणात चोरी केलेल्या आरोपीस मी ओळखू शकतो. तो आज रोजी व्ही.सी. वर हजर आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच. व्ही. गायकवाड यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु :-**

२. आरोपी हाच असल्याचे मला देशमूख नावाच्या कासार शिरसी पोलिस स्टेशनमधील पोलिसांनी सांगीतले होते. त्यांना आरोपी कसा समजला हे मी विचारले नव्हते. त्यांनी मला ४ आरोपी असल्याचे सांगीतले होते. त्यापैकी दोघांचे अडनाव टाक, एकाचे अडनाव जुन्नी आणि चौथ्याचे अडनाव कल्यानी असे होते. त्यांची पुर्ण नावे मला सांगता येत नाही. माझ्याकडे शॉपअॅक्ट परवाना आहे. तो मी पोलिसांना दाखवला होता. माझ्याकडे दागीने विक्री करण्याचा परवाना नाही. मला माझ्या दुकाणाचा नंबर सांगता येत नाही. त्या दुकानाचा मी आणि माझा भाच्चा प्रोप्रायटर आहोत. दुकाणातील माल आम्ही हुपरी आणि लातूर येथून खरेदी करतो. चोरीला गेलेला मुद्देमालापैकी कोणता माल हुपरी येथून आणि

कोणता माल लातूर येथून घेतला होता हे मला सांगता येत नाही. माझ्याकडे त्या खरेदीच्या पावत्या आहेत. मी त्या पावत्या पोलिसांना दिल्या होत्या. त्या अंदाजे १० ते १२ पावत्या होत्या. किती माल शिल्लक राहिला याच्या नोंदी माझ्याकडे ठेवत नाही. चांदीचे ब्रासलेट ७ ते ८ नग होते. त्याचे प्रत्येक नग किती वजनाचे होते हे मला सांगता येत नाही. करदोडे २०० ते २५० ग्रॅम वजनाचे होते. चार जोड तोडे होते. ते तोडे किती वजनाचे होते हे मला सांगता येत नाही. तोड्यांची अंदाजे रक्कम ९०००/– रुपये होती. लक्ष्मी मुरत्या किती होत्या हे मला निश्चीत सांगता येत नाही. चांदीमोड अंदाजे एक किलो होती. अंदाजे १५० ग्रॅम वजनाचे जोडवे होते. मला चोरी केलेला मुद्देमाल मिळालेला नाही. त्या प्रत्येक दागीन्यावर हॉलमार्क होता. तो हॉलमार्क राजेश आणि एस.एस.जे. असा होता. हे म्हणणे खरे नाही की, चांदीच्या दागीण्यावर हॉलमार्क असतो. चांदीजोडी म्हणजे चांदीचे जोडवे होय. पोलिसांनी माझ्या समक्ष १०८ नग चांदीची जोडवी(जोडी) जप्त केलेली नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष जप्त मुद्देमाल क्र. २८/२०२६ मधील पैंजनचा जप्ती पंचनामा केलेला नाही. मी चोरीला गेलेल्या चांदीच्या वस्तूंचा निश्चीत अकडा अगर वजन पोलिसांना सांगीतले नव्हते. मी माझ्या फिर्याद आणि पुरवणी जबाबामध्ये १०८ जोड पैंजन चोरीला गेल्याचे नमूद केलेले नाही. जप्त मुद्देमालास लाखी सिल नाही. तसेच त्यावर पंचांच्या सह्या नाहीत. जप्त चांदीचे पैंजन माझ्या दुकाणातील आहेत हे ओळखण्याकरीता त्या पैंजनवर आमच्या दुकानाचा स्टॅम्प अगर कोणतेही लेबल नाही. जप्त पैंजन कोठेही मिळू शकते. माझ्या दुकाणातील कपाटामध्ये बॉक्समध्ये चोरीस गेलेल्या वस्तू ठेवलेल्या होत्या. रिकामे प्लास्टीकचे डब्बे पोलिसांनी जप्त केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे मदनसुरी येथे दुकान नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांशी

संगनमत करुन खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्त वस्तूंशी माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. जप्त वस्तू मी आज कोर्टात पाहिल्या आहेत, या पुर्वी पाहिलेल्या नाहीत.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.24 11:24:36 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२३/०२/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा